महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

शनिवार ■ २४ जानेवारी २०२६ ■ वर्ष - सातवे ■ अंक : २०९ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

# दावोस परिषदेत ३७ लाख कोटींचे करार

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**स्वित्झर्लंडमधील दावोस येथे सुरू असलेल्या ५६ व्या जागतिक आर्थिक परिषदेत दोन दिवसांत महाराष्ट्रात ३७ लाख २७ हजार ७८७ लाख कोटी रुपयांचे ८१ सामंजस्य करार झाले. यातून ४२ लाख रोजगार निर्माणहोणार असल्याची माहिती उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिली.**




महाराष्ट्राच्या औद्योगिक इतिहासात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात दावोसमधून आलेली ही सर्वात गुंतवणूक मोठी घोषणा असल्याचे म्हटले जात आहे. कारण २०२१ ते २५ या ५ वर्षांत सुमारे २२ लाख कोटींचे करार झाले होते. अदानी समूहाने राज्याच्या प्रगतीसाठी ६६ अब्ज डॉलर्स म्हणजेच सुमारे ६,०५,०२२ कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचा 'मास्टर प्लॅन' सादर केला. यात प्रामुख्याने धारावी पुनर्विकास, पायाभूत सुविधा, हरित उर्जा, तंत्रज्ञान प्रकल्पात ही गुंतवणूक असेल. पायाभूत सुविधा, हरित ऊर्जा आणि तंत्रज्ञानात अदानी समूह राज्याचा 'दीर्घकालीन धोरणात्मक भागीदार' म्हणून काम करणार आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत झालेल्या या करारामुळे आगामी ७ ते १० वर्षांत महाराष्ट्राचे आर्थिक चित्र पूर्णपणे पालटणार आहे. राज्यातील तरुणांना मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी आणि शाश्वत विकासासाठी ही गुंतवणूक मैलाचा दगड ठरेल, असे फडणवीस म्हणाले.

> **राज्यातील तरुणांना मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी आणि शाश्वत विकासासाठी ही गुंतवणूक मैलाचा दगड ठरेल.**
> **- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

### काँग्रेसकडून श्वेतपत्रिकेची मागणी

मुंबई काँग्रेसच्या अध्यक्ष, खा. वर्षा गायकवाड म्हणाल्या की, दावोस दौरा जनतेच्या पैशांची उधळपट्टी आहे. लोढा डेव्हलपर्स, रहेजासारख्या मुंबईस्थित कंपन्यांच्या करारासाठी दावोसला जाण्याची गरज काय? गुंतवणूक, रोजगारावर सरकारने श्वेतपत्रिका काढावी.

| संभाजीनगरात १७,७०० कोटींची गुंतवणूक | |
|---|---|
| विभाग करार संख्या गुंतवणूक रक्कम | |
| मुंबई महानगर प्रदेश | ३७,२३,९३,३०० लाख कोटी |
| इतर विभाग | ७,७२,७२० लाख कोटी |
| कोकण | ११ ३,१०,८८६ लाख कोटी |
| नागपूर | ०९,१,९५,९५० लाख कोटी |
| नाशिक | ०७,३०,१०० कोटी |
| छत्रपती संभाजीनगर | ०२,१७,७०० कोटी |
| पुणे | ०४,३,२५० कोटी |
| अमरावती | ०१,१,००० कोटी |

### एमएमआरडीए: ९.५ लाख कोटींचे करार

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) १२ जागतिक संस्थांसोबत ९.५२ लाख कोटींचे सामंजस्य करार केले. यामुळे मुंबई महानगर प्रदेशात सुमारे ९.५ लाख थेट व अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होतील.

### भारतीय कंपन्यांच्या विदेशी भागीदारांमुळे दावोसला करार केले जातात : फडणवीस

"मुंबईत मंत्रालयाऐवजी दावोसला करार का?' या विरोधकांच्या प्रश्नावर मुख्यमंत्री म्हणाले की, दावोसला जगभरातील मोठे उद्योजक येतात. भारतीय कंपन्यांच्या विदेशी भागीदारांना आणि संचालक मंडळाच्या सदस्यांना कराराच्या वेळी उपस्थित राहण्याची इच्छा असते. हे सर्व सदस्य मुंबईत येऊ शकत नाहीत, परंतु दावोसमध्ये ते सहज उपलब्ध असतात. म्हणून तेथे करार केले जातात.

## गेल्या पाच वर्षांत झाले होते 22 लाख कोटींचे करार

### अदानी समूह ७ वर्षांत ६ लाख कोटी रुपये गुंतवणार

### जामनेरमध्ये कोका-कोलाचा प्रकल्प येणार

**जामनेर एमआयडीसीत (जळगाव) 'कोका-कोला' कंपनी प्रकल्प उभारणार आहे. फडणवीसांनी कोका-कोलाचे वरिष्ठ उपाध्यक्ष मायकल गोल्टझमन यांची भेट घेऊन यावर शिक्कामोर्तब केले. याविषयी महाजन म्हणाले की, या प्रकल्पामुळे तालुक्याच्या विकासाला मोठी गती मिळेल.**

## लक्षवेधी

### प्रधानमंत्री १८व्या रोजगार मेळ्यात नियुक्तीपत्रांचं वाटप

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या १८व्या रोजगार मेळयात विविध सरकारी विभाग आणि संस्थांमध्ये नव्याने नियुक्त झालेल्या ६१ हजार जणांना दूरस्थ पद्धतीनं नियुक्तीपत्रांचं वाटप करणार आहेत. या कार्यक्रमाला ते संबोधितही करतील. हा रोजगार मेळा देशभरात ४५ ठिकाणी होणार आहे.

### ठाण्यात २५ जानेवारीला राष्ट्रीय मतदार दिनाचा विशेष कार्यक्रम

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : येत्या २५ जानेवारी रोजी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात १६ व्या राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी, ठाणे यांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाचा उद्देश नव्या मतदारांना प्रोत्साहन देणे हा आहे. या कार्यक्रमाला मराठी चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध दिग्दर्शक व लेखक हेमंत ढोमे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून, कला, साहित्य व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर अतिथी तसेच निवडणूक दूतांची उपस्थिती लाभणार आहे. हा कार्यक्रम दि. २५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे येथे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ व अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न होणार आहे.

### भिवंडी : पीएमस्वनिधी अंतर्गत पथविक्रेत्यांना कर्ज व क्रेडिट कार्ड वितरण

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** आज दिनांक २३/०१/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता मा. पंतप्रधान यांच्या प्रमुख उपस्थितीत केरळ ,तिरुअनंतपुरम येथील भेटीदरम्यान प्रधानमंत्री स्वनिधी योजनेअंतर्गत देशभरात एक लाख कर्जाचे वितरण तसेच क्रेडिट कार्डचे उद्घाटन समारंभ झाला. या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण मनपा मुख्यालयात आभासीरित्या मा. अतिरिक्त आयुक्त श्रीमती नयना ससाणे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्या कार्यक्रमाकरीता मा. उपायुक्त श्री विक्रम दराडे सर , स्टेट बँक ऑफ इंडियाचे मॅनेजर श्री.पवन निगम सर, श्रीमती भावना पानी, समाज कल्याण विभागाचे विभाग प्रमुख श्री.मिलिंद पळसुळे सर व सर्व एन. यू. एल. एम विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. मा. अतिरिक्त आयुक्त श्रीमती नयना ससाणे यांच्या हस्ते पीएमस्वनिधी अंतर्गत स्टेट बँक ऑफ इंडिया, जकात नाका येथील एकूण 20 पथविक्रेत्यांना कर्ज वितरित करण्यात आले. तसेच भिवंडी महानगरपालिका क्षेत्रात असणाऱ्या इतर बँकांद्वारे एकूण अंदाजित 100 पथविक्रेत्यांना कर्ज वितरित करण्यात आले.



## बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त कल्याणकारी योजना राबवणार – उपमुख्यमंत्री शिंदे

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

शिवसेना प्रमुख दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त राज्यात विविध कल्याणकारी योजना राबवण्यात येणार असल्याची घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज केली. बाळासाहेब ठाकरे जयंतीनिमित्त आज मुंबईत आयोजित पत्रकारपरिषदेत ते बोलत होते. घरोघरी आरोग्य तपासणीची सुविधा देणारी आरोग्य आपल्या दारी मोहीम प्रथम मुंबईत आणि नंतर राज्यात इतरत्र राबवण्यात येईल असं त्यांनी सांगितलं. प्लास्टिक मुक्त गड किल्ले अभियान जागतिक वारसा यादीतल्या ११ किल्ल्यांवर आणि नंतर इतर किल्ल्यांवर चालवण्यात येणार आहे. त्यात सहभागी स्वयंसेवी संस्थांना १ लाख रुपये मानधन मिळेल. महिला बचत गट सक्षमीकरण, मराठी भाषा संवर्धन, रस्ता सुरक्षा, ज्येष्ठांसाठी एसटी संगे तीर्थाटन, या कामांसाठी प्रत्येकी १००कोटी रुपये तरतूद असेल. राज्यातल्या शाळांचा दर्जा सुधारण्यासाठी स्पर्धा घेऊन पहिल्या ३ शाळांना रोख पारितोषिकं दिली जाणार आहेत, अशी माहिती शिंदे यांनी दिली. झोपडपट्टी मुक्त मुंबई,तसंच आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रात दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांचं स्वप्न साकार करण्याकरता आपलं सरकार काम करील असं ते म्हणाले.

## जीवनदीप महाविद्यालयात बोलींचा जागर कार्यक्रम यशस्वी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**गोवेली** : जीवनदीप महाविद्यालय, गोवेली येथे महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याच्या अनुषंगाने कुपारी व वारली बोलींचा जागर कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. ३६ जिल्ह्यांमध्ये विद्यापीठे व महाविद्यालयांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमाचा उद्देश महाराष्ट्रातील मातृभाषा आणि स्थानिक बोलींचे जतन व संवर्धन करणे हा होता.

महाविद्यालय ते गोवेली गावपर्यंत ग्रंथ दिंडी व शोभायात्रा काढण्यात आली. विद्यार्थ्यांनी व प्राध्यापकांनी पारंपारिक पेहेरावात सहभाग घेतला व वारकरी नृत्य करून शोभायात्रेला रंगत आणली. दीप प्रज्वलन करून गणरायाच्या चरणी कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.




डॉ. नेहा सावंत आणि डॉ. रुपेश कोडीलकर यांनी कुपारी व वारली बोलींचा इतिहास, उगम व सांस्कृतिक वैशिष्ट्ये समजावून सांगितली. अध्यक्ष रविंद्र घोडविंदे यांनी बोली भाषेचे संवर्धन करण्याचे आवाहन केले आणि लोप पावत चाललेल्या परंपरा, संस्कृती व हस्ताक्षर आधुनिक पिढीने जतन करण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमात मुख्य समन्वयक, पर्यवेक्षक व अनुवादकांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. जीवनदीप महाविद्यालयाचे प्राचार्य व संचालक, तसेच निर्मल इंग्लिश मीडियम स्कूलचे शिक्षक व विद्यार्थी यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सतीश लकडे यांनी केले आणि सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

सर्व प्राध्यापक, शिक्षक, NSS स्वयंसेवक व विद्यार्थ्यांच्या सहभागाने बोलींचा जागर कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.

## प्रदूषण अहवालावर कारवाई नाही

### उच्च न्यायालयाचा महापालिकांवर कडक सवाल

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** हवा प्रदूषण रोखण्यासाठी न्यायालयाने आदेश देईपर्यंत कोणतीही ठोस उपाययोजना न केल्याबद्दल उच्च न्यायालयाने शुक्रवारी मुंबई व नवी मुंबई महापालिकेला फटकारले. प्रदूषण रोखण्यासाठी केलेल्या उपाययोजनांची माहिती देणारे वैयक्तिक प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश असूनही ते न पाळल्याने न्यायालयाने नवी मुंबई महापालिका आयुक्तांचे वेतन पुढील आदेशापर्यंत रोखण्याचे निर्देश दिले. मुंबई महापालिका आयुक्तांबाबतही दुपारच्या सत्रात असाच आदेश दिला जाण्याचे संकेत न्यायालयाने दिले.

न्यायालयाने नियुक्त केलेल्या समितीने मुंबई व नवी मुंबईतील ३६ प्रदूषणग्रस्त भागांची पाहणी करून अहवाल सादर केला होता. या अहवालात सर्व ठिकाणी वायू प्रदूषण नियमांचे उल्लंघन होत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. मात्र, नवी मुंबई महापालिकेने केवळ ११ ठिकाणांची पाहणी केल्याचा अपुरा तपशील असलेला अहवाल सादर केल्याने तसेच आयुक्तांनी वैयक्तिक प्रतिज्ञापत्र दाखल न केल्याने न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली.

## कल्याण तालुका वन विभागात भ्रष्टाचार

## निकृष्ट पिलर बांधकामे

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण तालुका वन विभागाच्या भोंगळ आणि भष्ट्र कारभारामुळे येथील वन क्षेत्र आणि वन जमिनीचे क्षेत्र घटत आहे. यास सर्वस्वी वन विभागाचे अधिकारी जबाबदार असताना याच अधिकारी कर्मचाऱ्यामुळे याच तालुक्यातील वन जमिनीच्या सीमा निश्चिती साठी काढण्यात आलेल्या करोडो रुपयांच्या ठेकेदारीत चक्क खुले आम भष्ट्र कारभार सुरु आहे.

तालुक्यातील 800 पिलर बाधाण्यासाठी हा ठेका काढण्यात आलेला आहे. एका पिलर साठी आठ हजार पाचशे रुपयाहून अधिक तरतूद असताना ठेकेदाराने चक्क दगड उभे करून त्यांना बाहेरून दगडी पावडरणे लिपले आहे. अतिशय निकृष्ट काम या पिलर बांधकामाचे आहे. फक्त पैसे लाटणे हाच उधोग या विभागातील कर्मचाऱ्यांचा आहे. त्यामुळे तालुक्यातील गावा गावातील वनसंरक्षण




> **याबाबत तालुका वन विभाग अधिकारी यांनी या प्रकरणी दखल घेऊन कडक कारवाई करणार असल्याचे सांगितले आहे.**
> **- श्री आखाडे, तालुका वन अधिकारी.**

समित्या व त्यांचे सदस्य सातप्त झाले असून.बापसई वन संरक्षण गाव समितीचे अध्यक्ष दिलीप टेबे यांनी या बाबत तक्रार केली आहे.

कल्याण तालुका वन विभागाच्या या भष्ट्र कारभारामुळे येथील वन क्षेत्र ही कमालीचे घेटले आहे.



# जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक-2026

## काय करावे व काय करु नये मार्गदर्शक सूचना जारी

मा.राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांच्याकडील दि.13 जानेवारी 2026 च्या आदेशान्वये रायगड जिल्ह्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम-2026 जाहीर करण्यात आला असून या कालावधीत काय करावे व काय करु नये याबाबतची मार्गदर्शक सूचना जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी जारी केली आहे.

**काय आहेत मार्गदर्शक सूचना जाणून घेवू या लेखातून... काय करावे व काय करू नये... काय करावे"**

चालू असलेले कार्यक्रम, योजना पुढे सुरु ठेवता येतील. ज्याविषयी शंका निर्माण होईल अशा बाबींच्या संबंधात, राज्य निवडणूक आयोग,महानगरपालिका आयुक्त, जिल्हाधिकारी यांच्याकडून स्पष्टीकरण, मान्यता प्राप्त करण्यात यावी. पूर, अवर्षण, साथीचे रोग किंवा अन्य नैसर्गिक आपत्ती यामुळे बाधित झालेल्या क्षेत्रातील जनतेसाठी साह्यकारी व पुनर्वसनाच्या उपाययोजना चालू करता येतील व या संदर्भात चालू असलेल्या योजना पुढे सुरु ठेवता येतील.

मरणासन्न किंवा गंभीररित्या आजारी असलेल्या व्यक्तींना रोख रक्कम किंवा वैद्यकीय सवलती देण्याचे समुचित मान्यतेने पुढे चालू ठेवता येईल. मैदानासारख्या सार्वजनिक जागा सर्व पक्षांना, निवडणुकीत उभे असलेल्या उमेदवारांना निवडणूक सभा घेण्यासाठी निःपक्षपातीपणे उपलब्ध करुन दिल्या पाहिजे. त्याचप्रमाणे सर्व पक्षांना, निवडणुकीस उभे असलेल्या उमेदवारांना हेलिपॅडच्या वापर निःपक्षपातीपणे उपलब्ध करुन दिला पाहिजे. विश्रामगृहे, डाकबंगले व इतर शासकीय निवासस्थाने वगैरे बाबतीत निवडणूक आयोगाने व त्या अनुषंगाने शासनाने काढलेल्या आदेशास संपूर्णतः अधीन राहून सर्व राजकीय पक्षांना व निवडणुकीस उभे असलेल्या सर्व उमेदवारांना समानतेच्या तत्त्वावर उपलब्ध करुन देता येणे अनुज्ञेय असल्यास त्याप्रमाणे देण्यात यावेत. इतर राजकीय पक्ष किंवा उमेदवार यांच्यावर करण्यात येणारी टीका ही त्यांची धोरणे, कार्यक्रम, पूर्वीची कामगिरी, पार पडलेली कामे, केवळ या बाबींशी संबंधित असावी. शांततामय व उपद्रवरहित गृहस्थ जीवन जगण्याच्या प्रत्येक व्यक्तीच्या अधिकाराचे पूर्णपणे जतन करण्यात यावे. प्रस्तावित सभेची जागा व वेळ याविषयी स्थानिक पोलीस प्राधिकाऱ्यांना पूर्ण माहिती देण्यात यावी आणि त्यासाठी आवश्यक त्या सर्व परवानग्या मिळविण्यात याव्यात. प्रस्तावित सभेच्या जागी निर्बंधात्मक व प्रतिबंधक आदेश जारी केलेले असल्यास त्यांचे पूर्णपणे पालन करण्यात यावे. आवश्यक असल्यास त्याबाबत सवलत मिळण्याविषयी अर्ज केले पाहिजेत व वेळीच अशी सवलत मिळविली पाहिजे. प्रस्तावित सभेसाठी ध्वनिक्षेपक (Loudspeaker) किंवा कोणत्याही इतर अशा सवलतीचा वापर करण्यासाठी योग्य परवानगी मिळविली पाहिजे. सभेमध्ये अडथळे आणणाऱ्या किंवा अव्यवस्था निर्माण करणाऱ्या व्यक्तींना प्रतिबंध करण्यासाठी पोलीसांचे सहाय्य मिळविण्यात यावे. कोणत्याही मिरवणुकीची प्रारंभीची वेळ व जागा, मिरवणूक ज्या मार्गाने जाईल तो मार्ग व मिरवणुकीची अखेर होईल अशी वेळ व स्थान ही बाब आगाऊ स्वरुपात निश्चितपणे ठरविण्यात यावी व पोलीस प्राधिकाऱ्यांकडून त्यासाठी आगाऊ परवानगी घेण्यात यावी. मिरवणूक ज्या वस्तीमधून जात असेल त्या वस्त्यांबाबत कोणतेही निर्बंधात्मक आदेश जारी केलेले असल्यास त्या विषयी खात्री करुन त्याचे पूर्णपणे अनुपालन करण्यात यावे. त्याचप्रमाणे सर्व वाहतूक नियमांचे व अन्य निर्बंधांचे अनुपालन करण्यात यावे. मिरवणुकीमुळे वाहतुकीत कोणताही अडथळा निर्माण होऊ देऊ नये. ज्यांचा क्षेपके किंवा हत्यारे म्हणून गैरवापर होऊ शकेल अशा कोणत्याही वस्तू मिरवणुकीत सहभागी असलेल्या व्यक्तींनी बाळगू नयेत.

मतदानाचे काम शांतता व सुव्यवस्थेने पार पडावे यासाठी सर्वतोपरी सर्व निवडणूक अधिकाऱ्यांना सहकार्य देण्यात यावे. उमेदवार व त्याच्या अधिकृत कार्यकर्त्यांनी विहित परवानगी घेऊन योग्य असे बिल्ले व ओळखपत्रे, निवडणूक प्रशासनाकडून मिळवावीत व ती निवडणुकीचे काम करणाऱ्या व्यक्तींनी ती दर्शनी भागावर लावावीत. मतदारांना देण्यात येणाऱ्या ओळखचिठ्ठ्या साध्या (पांढऱ्या) कागदावर देण्यात येतील व त्यावर कोणतेही चिन्ह, उमेदवाराचे किंवा पक्षाचे नाव यांचा निर्देश असणार नाही. मतदानाच्या दिवशी वाहनांच्या वापरावरील निर्बंधांचे पूर्णपणे पालन करण्यात यावे. राज्य निवडणूक आयोगाचे, महानगरपालिका आयुक्त यांचे अथवा जिल्हाधिकाऱ्यांचे किंवा त्यांनी प्रधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने दिलेले वैध प्राधिकारपत्र असल्याखेरीज कोणत्याही व्यक्तीस कोणत्याही वेळी मतदान कक्षात प्रवेश करता येणार नाही. वरच्या दर्जाच्या कोणत्याही व्यक्तींना (उदा. मुख्यमंत्री, मंत्री, राज्यमंत्री, संसद सदस्य, विधानसभा सदस्य, विधानपरिषद सदस्य) यांनाही यातून सूट देण्यात आलेली नाही. निवडणूक पार पाडण्याच्या संबंधातील कोणतीही तक्रार किंवा समस्या, निवडणूक निर्णय अधिकारी / क्षेत्र / प्रभाग दंडाधिकारी यांच्या किंवा राज्य निवडणूक आयोग यांनी नियुक्त केलेल्या निरीक्षकांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी. राज्य निवडणूक आयोग आयुक्त, महानगरपालिका/ जिल्हाधिकारी/निवडणूक निर्णय अधिकारी यांचे निवडणुकीच्या विविध पैलूंच्या संबंधातील सर्व बाबींविषयीचे निर्देश/ आदेश/अनुदेश यांचे पालन करण्यात यावे.

**"काय करु नये"......**

शासकीय वाहने किंवा कर्मचारी वर्ग किंवा यंत्रणा यांचा निवडणूक प्रचारविषयक कामासाठी वापर करण्यात येऊ नये.

शासकीय वाहनात पुढील कार्यालयाच्या वाहनाचा समावेश असेल:- केंद्र शासन, राज्य शासन, केंद्र व राज्य शासनाचे सार्वजनिक उपक्रम, मंडळे, महामंडळे, केंद्र शासन व राज्य शासनाच्या संयुक्त क्षेत्रातील उपक्रम, स्थानिक स्वराज्य संस्था, महानगरपालिका, नगर परिषदा/नगर पंचायती, पणन मंडळ (कोणत्याही नावाचे), सहकारी संस्था, जिल्हा परिषदा/पंचायत समित्या/ग्रामपंचायती, ज्यामध्ये सार्वजनिक निधी मग तो एकूण निधीच्या हिश्यातील कितीही अल्पांशाने असो गुंतवण्यात आला आहे अशी कोणतीही संस्था व संरक्षण मंत्रालय, गृह मंत्रालय, राज्य शासन, केंद्रीय पोलिस संघटना इत्यादीच्या मालकीची असलेली पुढील वाहने-मालमोटारी, लॉरी, टेंपो, जीपगाड्या, मोटारगाड्या, ऑटोरिक्षा, बसगाड्या, विमाने, हेलिकॉप्टर, जहाजे, बोटी, हॉवर क्रॉफ्ट व इतर सर्व वाहने. सत्तेमध्ये असलेला पक्ष/शासन यांनी साध्य केलेल्या उद्दीष्टांबाबत सरकारी कोषागाराच्या खर्चाने कोणतीही जाहिरात देऊ नये. कोणत्याही वित्तीय अनुदानाची घोषण करणे, कोनशिला बसविणे, नवीन रस्ते इ. बांधण्याचे वचन देणे इत्यादी गोष्टी करु नयेत. शासन/सार्वजनिक उपक्रम यांच्या सेवेत कोणत्याही तदर्थ (Ad hoc) नियुक्त्या करु नयेत. मंत्री (राज्यमंत्री व उपमंत्रीसहित) हे उमेदवार असल्याखेरीज किंवा प्राधिकृत प्रतिनिधी असल्याखेरीज किंवा मतदानासाठी मतदार या नात्याने असेल त्याखेरीज मतदान कक्षामध्ये किंवा मतमोजणीच्या जागी प्रवेश करणार नाहीत. निवडणूक मोहिम/प्रचार यांच्या जोडीने कोणतेही सरकारी काम पार पाडण्यात येऊ नये. मतदारास आर्थिक किंवा अन्य प्रकारचे कोणतेही प्रलोभन दाखविण्यात येऊ नये.

मतदाराच्या जातीय व धार्मिक भावनांना आवाहन करण्यात येऊ नये. विभिन्न जाती, जमाती यांच्यातील किंवा धार्मिक किंवा भाषिक गटातील मतभेद ज्यामुळे अधिक तीव्र होतील किंवा परस्परातील वैमनस्य वाढेल किंवा त्यांच्यात तणाव निर्माण होईल अशी कोणतीही कृती करण्याचा प्रयत्न करण्यात येऊ नये. इतर पक्षांचे कोणतेही नेते किंवा कार्यकर्ते यांच्या सार्वजनिक कार्याशी संबंधित नसेल अशा त्यांच्या खाजगी जीवनातील कोणत्याही पैलूवर टीका करण्याची परवानगी देण्यात येऊ नये. ज्यांचा खरेखोटेपणा पडताळून पाहिलेला नाही असे आरोप ठेवून किंवा त्यास विकृत स्वरुप देऊन इतर पक्ष किंवा त्यांचे कार्यकर्ते यांच्यावर टीका करण्यात येऊ नये. निवडणूक प्रचार तसेच भाषणे, निवडणूक प्रचाराचे फलक, संगीत इत्यादी साठी कोणत्याही प्रार्थनास्थळांचा वापर करण्यात येऊ नये. लाच देणे, आवजवी प्रभाव टाकणे, मतदारांना धाकदपटशा दाखविणे, खोट्या नावाने मतदान करणे, मतदारांना मतदान कक्षापर्यंत पोहोचविणे व तेथून परत नेणे यासारख्या भ्रष्ट प्रथा किंवा निवडणूक विषयक अपराध करण्यास प्रतिबंध आहेत. व्यक्तींची मते किंवा कृत्ये याविरुध्द निषेध व्यक्त करण्यासाठी त्यांच्या घरासमोर निदर्शने किंवा धरणे धरण्यात येऊ नये. कोणत्याही व्यक्तीला, अन्य कोणत्याही व्यक्तीची जमीन, इमारत आवारभिंत इत्यादींचा वापर त्यांच्या मालकांच्या परवानगीखेरीज करणे, ध्वजदंड उभारणे, कापडी फलक लावणे, नोटीशी चिकटविणे किंवा घोषणा लिहिणे इत्यादी करता येणार नाही. यामध्ये शासकीय, सार्वजनिक व खाजगी जागांचा समावेश असेल. इतर राजकीय पक्षांच्या किंवा उमेदवारांच्या सार्वजनिक सभांमध्ये किंवा मिरवणुकीत कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण करण्यात येऊ नये. एका पक्षाची जेथे सभा चालू असेल अशा जागी दुसऱ्या पक्षाद्वारे मिरवणूक काढण्यात येऊ नये. दुसऱ्या पक्षांनी किंवा उमेदवारांनी लावलेली प्रचारपत्रके, भित्तीपत्रके काढून टाकण्यात येऊ नयेत. मात्र याबाबत काही आक्षेप असल्यास पोलिसांच्या किंवा निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या निदर्शनास आणावे.

मतदानाच्या दिवशी ओळखचिठ्ठ्या वितरीत करण्याच्या जागी किंवा मतदान कक्षाजवळ प्रचारपत्रके, पक्षांचे ध्वज, चिन्हे किंवा इतर प्रचार साहित्य यांचे प्रदर्शन करु नये. ध्वनिक्षेपकांचा मग ते एकाच जागी लावलेले असोत किंवा फिरत्या वाहनांवर बसविलेले असोत, सकाळी 6.00 वाजण्यापूर्वी किंवा रात्री 10.00 वाजल्यानंतर आणि संबंधित प्राधिकाऱ्यांची लेखी पूर्वपरवानगी घेतलेली असल्याखेरीज वापर करु नये. तसेच याबाबत असलेले The Noise Pollution (Regulation and Control) Rules, 2000 ची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.. तसेच संबंधित प्राधिकाऱ्यांची लेखी पूर्वपरवानगी असल्याखेरीज सार्वजनिक सभेच्या जागी किंवा मिरवणुकीत किंवा प्रचारफेरीत ध्वनिक्षेपकाचा वापर करु नये. अशा सभा/ प्रचारफेरी रात्री १०.०० वाजल्यानंतर चालू ठेवण्याची परवानगी देण्यात येणार नाही. याबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन व्हावे तसेच घालून दिलेल्या अटींचे पालन करावे.

याखेरीज, ती स्थानिक कायदे, त्या क्षेत्रातील सुरक्षिततेच्या आवश्यकतेचा स्थानिक दृष्टीकोन आणि हवामान, सणासुदीचे दिवस, परिक्षेचा काळ यांच्या अधीनतेने असतील. निवडणुकीच्या काळात कोणत्याही प्रकारच्या पैशाचे, मद्याचे, वस्तूंचे वाटप करण्यात येऊ नये.

**मनोज सुमन शिवाजी सानप**
**जिल्हा माहिती अधिकारी**
**रायगड-अलिबाग**

# मार्चपासून पत्रीपुलाच्या तिसऱ्या पुलावरून प्रवास होणार सुरू



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : पत्रीपुलाच्या तिसऱ्या उड्डाणपुलावरून वाहतूक महिनाभर विलंबाने सुरू होणार असून जे काम फेब्रुवारी महिन्यात पूर्ण होणे अपेक्षित होते, परंतु आता ते मार्चमध्ये होणार असल्याची माहिती समोर येत आहे.

राज्य रस्ते विकास महामंडळ (एमएसआरडीसी) च्या अधिकाऱ्यांनी याबाबत माहिती दिली. त्याच विभागातील अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार तो पूल जानेवारी अखेर काम पूर्ण होऊन फेब्रुवारी महिन्यात खुला केला जाईल असे सांगितले होते. त्यानुसार पुलाच्या गर्डरचे काम पूर्ण झाले असून अन्य कामे सुरू आहेत, तांत्रिकदृष्ट्या ती कामे पुढे नेण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

या पुलासाठी ३१ कोटींचा निधी मंजूर झाला होता, त्या पुलाचे ३६.६ आणि ४० मीटर अशा दोन भागात गर्डर टाकण्यात आले होते. पुलाची लांबी १०९ मीटर असून त्या पुलाची मागणी कल्याण लोकसभेचे लोकप्रिय खा. श्रीकांत शिंदे यांनी केली होती. त्यानुसार तत्कालीन सार्वजनिक बांधकाम मंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली एमएसआरडीसीने त्यास मंजुरी दिली. नव्या पुलामुळे वाहतूककोंडी कमी होणार असून समांतर रेल्वे उड्डाणपूल होणे आवश्यक होते. त्यानुसार आधीचा उड्डाणपूल तयार झाल्यावर तिसरा उड्डाणपूल होणे आवश्यक होते.

# ठाकरेंची साथ सोडणाऱ्या महिला नेत्याच्या गळ्यातच महापौर पदाची माळ






**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुंबई दि.२२** : मुंबई महापालिकेच्याह्र महापौर पदाची आरक्षणाची सोडत आज जाहीर झाली आहे. मुंबई महापालिकेच्या महापौर पदासाठी सर्वसाधारण महिला प्रवर्गाला आरक्षण जाहीर झालं आहे. यानंतर आता भाजपच्या काही महिला नगरसेवकांचं नाव महापौर पदाच्या शर्यतीत आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला मुंबई महापालिका निवडणुकीत अपेक्षित यश मिळालं नाही. ठाकरे गटाला केवळ ६५ जागांवर यश मिळालं. तर भाजपला ८९ जागांवर यश मिळालं. भाजप हा मुंबई महापालिका निवडणुकीत सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. तर त्यांच्या पाठोपाठ उद्धव ठाकरे यांचा पक्ष हा मुंबईतील क्रमांक दोनचा पक्ष ठरला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पक्षाला मुंबईत २९ जागांवर यश मिळालं आहे. त्यामुळे मुंबई महायुतीला ११६ जागा मिळाल्या आहेत. मुंबई महापालिकेत स्पष्ट बहुमतसाठी ११४ जागांची आवश्यकता होती. पण महायुतीला त्यापेक्षा दोन जागा जास्त मिळाल्या आहेत. पण तरीही महापौर पदाच्या सोडत पर्यंत भाजप आणि शिवसेनेला धाकधूक होती. कारण महापौर पदाची सोडत ही एसटी प्रवर्गासाठी असती तर सत्ताधारी पक्षांचे त्या प्रवर्गातील उमेदवार जिंकून आलेले नाहीत. केवळ उद्धव ठाकरे यांच्या पक्षाकडे एसटी प्रवर्गातील दोन उमेदवार आहेत. त्यामुळे मुंबई महापालिकेच्या महापौर पदाच्या निवडणुकीमुळे राजकारणात मोठा ट्विस्ट येणार आणि ठाकरेंच्या शिलेदाराच्या गळयात महापौर पदाची माळ पडणार का? अशी चर्चा रंगली होती.

यानंतर आता उद्धव ठाकरे यांच्या पक्षाला सोडचिठ्ठी दिलेल्या महिला नेत्याच्या गळ्यात महापौर पदाची माळ पडणार का? अशी चर्चा आता रंगू लागली आहे. त्यामागे कारणही अगदी तसंच आहे. खरंतर भाजपकडे तब्बल ४९ महिला नगरसेविका जिंकून आल्या आहेत. यापैकी अनेक महिला नगरसेवकांना अनेक वर्षांचा अनुभव आहे. तसेच महापौर पदाची सोडत ही सर्वसामान्य महिला प्रवर्गासाठी राखीव झाल्याने भाजपमधील राजश्री शिरवडकर, अलका केरकर, हर्षिता नार्वेकर, रितू तावडे, आशा मराठे, शितल गंभीर, योगिता सुनील कोळी यांची नावे महापौर पदाच्या शर्यतीत आहे. पण असं असलं तरी ठाकरेंच्या शिवसेनेत एकेकाळी काम केलेल्या तेजस्वी घोसाळकर यांचंदेखील नाव मुंबईच्या महापौर पदासाठी चर्चेत आहे.

तेजस्वी घोसाळकर यांनी मुंबई महापालिका निवडणुकीच्या काही महिन्यांआधी भाजपमध्ये प्रवेश केला होता. त्यांचे पती अभिषेक घोसाळकर शिवसेनेचे माजी नगरसेवक होते. पण त्यांचा फेब्रुवारी २०२४ मध्ये निर्घृण खून करण्यात आला होता. त्यामुळे एकच खळबळ उडाली होती. तसेच तेजस्वी घोसाळकर यांचे सासरे विनोद घोसाळकर हे ठाकरे गटाचे माजी आमदार आहेत. स्वतः तेजस्वी घोसाळकर या दुसऱ्यांदा महापालिकेत निवडून गेल्या आहेत. तसेच पतीच्या निधननंतर मुंबै बँकेच्या संचालकपदी तेजस्वी घोसाळकर यांची वर्णी लागली होती.

तेजस्वी घोसाळकर हे ठाकरे गटात नाराज असल्याच्या चर्चा समोर आल्या होत्या. त्यावेळी उद्धव ठाकरे यांच्या पक्षाकडून त्यांची मनधरणी करण्याचा पूरेपूर प्रयत्न करण्यात आला होता. पण काही दिवसांनी त्यांनी भाजपात प्रवेश केल्याचं वृत्त समोर आलं होतं. तेजस्वी घोसाळकर या दहीसर येथील वॉर्ड क्रमांक २ येथून मोठ्या मताधिक्याने निवडून आल्या आहेत. त्यांचा आतापर्यंतचा राजकीय अनुभव पाहता भाजपकडून त्यांची मुंबई महापालिकेच्या महापौर पदी वर्णी लागू शकते अशी चर्चा आहे. असं असलं तरी भाजप धक्कातंत्रासाठी प्रसिद्ध आहे. भाजपने धक्कातंत्राचा अवलंब केला तर वेगळयाच चर्चेत नसलेल्या चेहऱ्यालाही महापौर पदाची संधी मिळू शकते असे बोलले जात आहे.

# कल्याण पश्चिमेतील सोसायटीत नवनिर्वाचित नगरसेवकांचे स्वागत





**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : कल्याण डोंबिवली महापालिका निवडणुकीत निवडून आलेल्या भारतीय जनता पार्टीचे नवनिर्वाचित, नगरसेवक अमित धाक्रस यांचा कल्याण पश्चिमेतील सनराईस गॅलेक्सी को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटीच्या वतीने भव्य स्वागत समारंभ आयोजित करण्यात आला.

या प्रसंगी बोलताना नगरसेवक अमित धाक्रस यांनी नागरिकांचे आभार मानत सांगितले की, "मला आपण निवडून दिले आहे, याबद्दल मी आपला ऋणी आहे. प्रभागातील सर्व समस्या सोडवण्यासाठी मी सदैव तत्पर राहीन. नागरिकांसाठी माझा भ्रमणध्वनी 24 तास उपलब्ध राहील, अशा शब्दांत नवनिर्वाचित नगरसेवक अमित धाक्रस यांनी भावना व्यक्त केल्या. या स्वागत समारंभाच्या स्वागताध्यक्ष म्हणून ज्योती सोलंकी, उपाध्यक्ष, महिला मोर्चा, जुनी कल्याण (प.) शहर, भाजप यांनी भूमिका पार पाडली. याच कार्यक्रमात ज्योती सोलंकी यांची पुन्हा एकदा उपाध्यक्ष, महिला मोर्चा, जुनी कल्याण (प.) शहर, भाजप या पदावर नियुक्तीही करण्यात आली.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी चेतना भोईर, तृप्ती गायकवाड, ज्योती सोलंकी, शितल लोलेवार, शाहीद शेख, नयना आडके, रईस खान, शबनम शेख, बीना चावडा, मुन्नाफ शेख, गोरजा चांदणे, राधा, तेजल मेहता, संगीता म्हात्रे यांनी विशेष योगदान दिले. हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

# अनधिकृत बांधकामाच्या विळख्यात वसलंय दिवा शहर



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : दिवा विभागात मोठ्या प्रमाणावर सुरू असलेल्या व अस्तित्वात असलेल्या अनधिकृत बांधकामांवर ठाणे महानगरपालिका अतिक्रमण विभागाकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचा गंभीर आरोप उद्धवसेनेचे कल्याण ग्रामीण विधानसभा प्रमुख ॲड. रोहिदास मुंडे यांनी केला आहे.

निवडणूक काळात व त्या आधीही दिवा परिसरात अनेक अनधिकृत इमारती, मजले व बांधकामे उभी राहिली. यासंदर्भात अनेक इमारतींना नोटिसा देण्यात आल्या असल्या तरी प्रत्यक्षात कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे. यापूर्वी उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार खान कंपाऊंड परिसरातील १५ अनधिकृत इमारती तोडण्यात आल्या.

दिवा विभागात कारवाई न होणे म्हणजे न्यायालयीन आदेशांचा आणि कायद्याचा अवमान असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. या संदर्भात पालिका आयुक्तांना निवेदन देत सर्व अनधिकृत बांधकामांवर कारवाईची मागणी केली आहे. ठोस कारवाई झाली नाही, तर उच्च न्यायालयात याचिका दाखल करू, असा इशाराही मुंडे यांनी दिला आहे.

# जानकीबाई ठाकूर विद्यालयाने ग्रामीण भागात उघडली इंग्रजी शिक्षणाची दालनं





**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण** : ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार व आंतरराष्ट्रीय पातळीचे इंग्रजी शिक्षण मिळावे, या उद्देशाने आत्माराम ठाकूर मिशन अंतर्गत जानकीबाई जनार्दन ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल, आवरे ची स्थापना २००६ साली स्वर्गीय अशोक ठाकूर सर यांनी केली. "विद्वान सर्वत्र पूज्यते" आणि "विद्या विनय शोभते" या मूल्यांवर आधारित ही संस्था आज पंचक्रोशीतील आदर्श शैक्षणिक केंद्र ठरली आहे. अवघ्या ७ विद्यार्थ्यांपासून सुरू झालेल्या या विद्यालयात आज ३५० हून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत असून, १८ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत आहेत. निसर्गरम्य व प्रदूषणमुक्त परिसर, सुसज्ज वर्गखोल्या, e-learning सुविधा, ग्रंथसंपदा व प्रायोगिक शिक्षण ही विद्यालयाची वैशिष्ट्ये आहेत. विद्यालयाचा SSC निकाल स्थापनेपासून आजपर्यंत १००% लागलेला असून अनेक विद्यार्थी गुणवत्ता यादीत झळकले आहेत.

क्रीडा, योग, विज्ञान प्रदर्शन, चित्रकला, वक्तृत्व, मार्शल आर्ट्स व विविध सांस्कृतिक उपक्रमांत विद्यालयाचे विद्यार्थी तालुका व जिल्हास्तरावर उल्लेखनीय यश संपादन करत आहेत.भारतीय संस्कृती, नीतिमूल्ये व सामाजिक जाणीव जपणाऱ्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये संस्कारक्षम, आत्मनिर्भर व उद्योगशील नागरिक घडविण्याचे कार्य हे विद्यालय सातत्याने करत आहे. त्यामुळे जानकीबाई जनार्दन ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल हे केवळ आवरे गावाचे नव्हे, तर संपूर्ण पंचक्रोशीचे आदर्श विद्यालय म्हणून ओळखले जाते अशी माहिती वामन जनार्दन ठाकूर सचिव,जानकीबाई जनार्दन ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल, आवरे यांनी दिली.

# भविष्यवेध



**शनिवार**
**२४ जानेवारी २०२६**

**मेष**
तुमच्या मुलांकडून मिळालेली चांगली बातमी तुमच्या हृदयाला आनंद देईल. आळस झटका नी कामाला लागा नाहीतर नंतर होईल पश्चाताप.

**वृषभ**
तुमचा दिवस समाधानी जाईल. घरच्या खरेदीसाठी मार्केटमध्ये वेळ घालवाल, बरेच पैसे खर्च होतील. मित्रांची समस्या सोडवून द्या, त्यांना आनंद होईल.

**मिथुन**
कुटुंबातील एखाद्या सदस्याच्या कामगिरीमुळे घरात आनंदी वातावरण येईल. रात्रीचे जेवण आणि मनोरंजन हा एक संस्मरणीय कार्यक्रम असू शकतो.

**कर्क**
थोड्याशा मेहनतीने तुम्ही उच्च पदावर पोहोचू शकता. मची आर्थिक परिस्थिती मजबूत करण्यासाठी काही महत्त्वाच्या योजना आखल्या जातील.

**सिंह**
तुम्ही दिवसभर घरगुती व्यवस्था आणि दुरुस्तीमध्ये व्यस्त असाल. तुमच्या मुलांसोबत बसा आणि त्यांच्या समस्यांवर सोडवण्यास मदत करा.

**कन्या**
तुम्हाला मानसिक आणि आध्यात्मिक शांतीचा अनुभव येईल. इच्छित कामे वेळेवर पूर्ण केल्याने तुमच्या मनात आनंद येईल. गप्पांमध्ये वेळ जाईल.

**तुळ**
घर सोडून दुसरीकडे गेलेल्या शेजाऱ्यांशी भेट होईल. आळस सोडून पूर्ण उर्जेने आणि आत्मविश्वासाने स्वतःला तुमच्या कामात झोकून द्या. काळ नवीन यश निर्माण करेल.

**वृश्चिक**
उत्पन्नाचे स्रोत देखील वाढतील. पार्टनर काही छानशी भेटवस्तू गिफ्ट देईल. दिवस आनंदात जाईल. कामाच्या ठिकाणी तुमचे तात्काळ निर्णय सकारात्मक असतील.

**धनु**
आधी सुरू केलेली, अडकलेली कामं पूर्ण करा. जर तुम्ही तुमच्या जीवनशैलीत बदल करण्याचा विचार केला तर ते फायदेशीर ठरेल. स्वतःसाठी थोडा वेळ काढा.

**मकर**
सहकाऱ्यांशी सौहार्दपूर्ण संबंध ठेवा. अनावश्यक कामांमध्ये वेळ वाया घालवू नका. ऑफिसमधील कामात थोडीशीही निष्काळजीपणा ताण आणू शकतो

**कुंभ**
राजकीय कार्यात सहभागी होऊन तुमचा वेळ खूप छान जाईल. प्रभावशाली लोकांशीही तुमचे चांगले संबंध असतील. घरात आनंदी वातावरण राहील.

**मीन**
तुम्ही तुमच्या कुटुंबासह धार्मिक कार्यात सहभागी व्हाल. ऑफिस आणि व्यवसायात टीम वातावरणात काम केल्याने उत्कृष्ट व्यवस्थापन सुनिश्चित होईल.

# बदलापुर : स्कूल व्हॅन प्रकरणात आरोपीला ३ दिवस पोलीस कोठडी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



**कल्याण** : बदलापुरात स्कूल व्हॅनमध्ये एका चार वर्षीय चिमुकलीवर लैंगिक अत्याचाराचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना गुरुवारी घडली. याप्रकरणी पोलिसांनी आरोपी वाहन चालकाला अटक केली असून गुन्हा दाखल करून आरोपीला शुक्रवारी कल्याण न्यायालयात हजर केले असता कल्याण कोर्टाने चार वर्षाच्या मुलीवर अत्याचार करणाऱ्या नराधमाला 27 जानेवारी पर्यंत 3 दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. कल्याण सत्र न्यायालयातील न्यायाधीश पत्रावळे यांच्या दालनात सुनावणी दरम्यान नराधमाला ३ दिवसाची कोठडी देण्यात आली. बदलापूर पश्चिमेकडील एका खाजगी शाळेत चार वर्षांची चिमुकली शिकत होती. ती नेहमीप्रमाणे दुपारी 12.30 वाजेपर्यंत स्कूलव्हॅन मधून घरी न परतल्यामुळे तिच्या आईने व्हॅन चालकाकडे फोन करून विचारणा केली. त्यानंतर साधारण दीड तासानंतर चिमुकली घरी आली. ती अत्यंत भेदरलेल्या अवस्थेत होती. तिच्या आईने तिच्याकडे विचारणा केली असता तिने घडलेला प्रकार आईला सांगितला. आरोपीने चिमुकलीच्या गुप्तांगाला हात लावल्याचं तिने आपल्या आईला सांगितलं. त्यानंतर चिमुकलीच्या पालकांनी तत्काळ पोलीस स्टेशनमध्ये धाव घेतली. पोलिसांनी व्हॅन चालकाला अटक केली असून गुन्हा दाखल करत आरोपी व्हॅन चालकाला पोलिसांनी अटक केली. शुक्रवारी कोर्टाने त्याला २७ जानेवारी पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. यानंतर आता आणखीन काही खुलासे या घटनेत होण्याची शक्यता आहे.

महाराष्ट्र शासन

## सार्वजनिक बांधकाम विभाग

### संक्षिप्त ई-निविदा सुचना क्र. ३९ सन २०२५-२६

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | जिल्हा सामान्य रूग्णालय ठाणे येथे ९०० खाटांचे जिल्हा सामान्य रूग्णालय, संदर्भ सेवा रूग्णालय व परिचारिका प्रशिक्षण केंद्र व वसतीगृहाचे इमारतीचे बांधकाम करणे ता. जि. ठाणे. (फर्निचर बनविणे, पुरवठा करणे व बसविणे) | ५१,१०,७४,३६१.०० |

१. डाऊन लोड करण्याचा कालावधी : दिनांक. २०/०१/२०२६ ते दिनांक. ०४/०२/२०२६
२. निविदा पुर्व बैठक : दिनांक. २७/०१/२०२६ दुपारी १२.०० वाजता. मुख्य अभियंता,(सा. बां.) प्रादेशिक विभाग, मुंबई.
३. ई-निविदा उघडणे (शक्य असल्यास) : दिनांक. ०५/०२/२०२६ अधिक्षक अभियंता, सा. बां. मंडळ यांचे कार्यालयात दु.१४.०० उघडण्यात येईल.

सर्वपात्र/ईच्छुक निविदाकारांनी निविदापत्रक डाऊनलोड करण्यासाठी व निविदाप्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई-निविदा प्रणालिच्या https//mahatenders.gov.in या पोर्टलवर portal वर enrolled करणे आवश्यक आहे.

**जा.क्र.ठावि/निविदा/३१६.**
**कार्यकरी अभियंता यांचे कार्यालय**
**सा.बा.विभाग, क्र.१ ठाणे**
**दिनांक - १६/०१/२०१६.**

**सही /-**
**कार्यकारी अभियंता**
**सा.बां. विभाग, क्र १ ठाणे**

# भारताच्या नावावर दिनेश गुप्ता यांचा सहावा गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** 77 व्या प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला प्रेरणादायी वक्ते प्रो. डॉ. दिनेश गुप्ता 'आनंदश्री' यांनी भारताला आणखी एक गौरवशाली यश मिळवून दिले आहे. त्यांनी सर्वात कमी वेळेत दहा पेन्सिली सरळ उभ्या करण्याचा अनोखा विक्रम प्रस्थापित करत नवा गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे. हा विक्रम पूर्ण करण्यासाठी त्यांना केवळ 14 सेकंद 72 मिलिसेकंद इतका वेळ लागला असून, हा वेळ मागील विक्रमापेक्षा सुमारे एक सेकंदाने कमी आहे.

सलग एक आठवडा दिवस-रात्र कठोर सराव केल्यानंतर हा विक्रम 29 डिसेंबर 2025 रोजी अधिकृतरीत्या एटेम्प्ट करण्यात आला. गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्सच्या कठोर मार्गदर्शक तत्त्वे व सखोल तपासणी प्रक्रियेनंतर 23 जानेवारी 2026 रोजी ई-मेल तसेच अधिकृत वेबसाइटवरून हा विक्रम दिनेश गुप्ता यांच्या नावावर घोषित करण्यात आला. विशेष म्हणजे, दिनेश गुप्ता यांनी प्रस्थापित केलेला हा सहावा गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड आहे. यापूर्वीही त्यांनी अनेक अद्भुत व प्रेरणादायी विक्रम करून दाखवले आहेत. या यशाचे श्रेय त्यांनी आपल्या कुटुंबीय, मित्रमंडळी, शेजारी तसेच रोटरी क्लब ऑफ कल्याण डायमंडच्या सर्व सदस्यांना दिले आहे. हा विक्रम केवळ एका व्यक्तीचा नसून, तो संपूर्ण भारत आणि प्रत्येक भारतीयाच्या अभिमानाचा क्षण आहे.

# 27 जानेवारी रोजी भाजपच्या गटनेते पदाची नियुक्ती

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : ठाणे वर्तकनगर येथील भाजपच्या मुख्य पक्ष कार्यालयात आज नवनिर्वाचित नगरसेवकांची बैठक पार पडली. या बैठकीला भाजपचे जिल्हाध्यक्ष संदीप लेले, आमदार निरंजन डावखरे तसेच प्रदेश सरचिटणीस माधवी नाईक उपस्थित होते.

या बैठकीत भाजपच्या गटनेतेपदाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. येत्या २७ जानेवारी रोजी भाजपच्या गटनेतेपदी अनुभवी व्यक्तीची नियुक्ती केली जाईल. तसेच पहिल्यांदाच निवडून आलेल्या नगरसेवकांचाही विचार केला जाऊ शकतो, अशी माहिती आमदार निरंजन डावखरे यांनी दिली. सत्तेतील मित्रपक्षाने यथोचित सन्मान भारतीय जनता पार्टीला दिला पाहिजे. असंही डावखरे म्हणाले.

यावेळी जिल्हाध्यक्ष संदीप लेले यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले की, महापौर, उपमहापौर, स्थायी समिती अध्यक्ष व सभागृह नेते ही सर्व महत्त्वाची पदे भाजपकडेच राहावीत, यासाठी पक्षाकडून ठाम दावा करण्यात येत आहे.

तसेच महानगरपालिकेतील प्रभाग समिती या ठिकाणी असणारे पद परिवहन आणि शिक्षण मंडळ या ठिकाणी देखील भाजपला सामावून घ्यावे, भाजप पक्षामध्ये देखील sc प्रवर्गातील उमेदवार नगरसेवक निवडून आले आहेत. सुरेश कांबळे आणि उषा वाघ यांचासुद्धा विचार मित्रपक्षाने करावा, असे आमदार निरंजन डावखरे यांनी सांगितले.

# बदलापूर : रोटरी क्लबच्या उपक्रमात महिलांना आरोग्य-जागरूकता

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर** : रोटरी क्लब ऑफ बदलापूर इंडस्ट्रिअल एरियाच्या महिला विभागाने नारीवली बांगरपाडा भागातील महिलांसाठी हळदी-कुंकू आणि आरोग्य-जागरूकता कार्यक्रम आयोजित केला. दातांची स्वच्छता, मुख आरोग्य व सिकलसेल-ॲनिमिया तपासणीसाठी ४० ते ५० महिलांची तपासणी करण्यात आली.

# भिवंडी महानगरपालिका : पीएमटीबी मुक्त भारत अभियानांतर्गत क्षयरोग निर्मूलनासाठी नागरिकांना आवाहन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेअंतर्गत राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रमानुसार प्रधानमंत्री टी.बी. मुक्त भारत अभियान राबविण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. या योजनेअंतर्गत शहरातील ४११४ क्षयरोग रुग्णांना औषधोपचारासोबत मासिक Food Basket (रु. ६०० ते रु. ८००/-) पुरविण्याचे नियोजन आहे. या मदतीसाठी नागरिक, लोकप्रतिनिधी, अशासकीय संस्था, सहकारी संस्था, कॉरपोरेट संस्था तसेच शासकीय व निमशासकीय अधिकारी-कर्मचारी सहभागी होऊ शकतात.

सहा महिन्यांपासून दोन वर्षांपर्यंत औषधोपचार चालू असताना इच्छेनुसार Food Basket उपलब्ध करून देऊ शकतात. शासनाच्या निक्षय पोर्टलवर नोंदणी करून रुग्णांना मदत केल्यावर प्रमाणपत्रही दिले जाईल. इच्छुकांनी आपले नाव, पत्ता, ई-मेल, मोबाइल नंबर व किती रुग्ण दत्तक घेणार आहेत याची माहिती श्री. अनिल गुप्ता, जिल्हा समन्वयक (मो. ७०२१५०७४२७) यांना द्यावी.

भिवंडी निजामपूर महानगरपालिकेच्या प्रशासक व आयुक्त श्री. अनमोल सागर, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. संदीप गाडेकर आणि शहर क्षयरोग अधिकारी डॉ. बुशरा सैय्यद यांनी सर्व नागरिकांना, संस्था व अधिकारी-कर्मचाऱ्यांना "निक्षय मित्र" बनण्याचे आवाहन केले आहे. या माध्यमातून रुग्णांना औषधोपचार, मदत व जनजागृती करून टी.बी. निर्मूलनासाठी योगदान देण्यास प्रोत्साहन दिले जात आहे.

# मुख्यमंत्री युवा योजना बेरोजगारांसाठी प्रशिक्षण संधी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : कौशल्य रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्यावत्तीने राज्यातील युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण व त्यांची नोकरी मिळण्याची क्षमता वाढविण्यासाठी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना महाराष्ट्र शासनाने 2024-25 या आर्थिक वर्षापासून सुरु केली आहे. या माध्यमातून उद्योजक, खासगी क्षेत्रातील आस्थापना, सेवा क्षेत्र आस्थापनांना मनुष्यबळ मिळणार आहे. आस्थापनांमध्ये रुजू होणाऱ्या 12 वी पास प्रशिक्षणार्थीना 6 हजार, आयटीआय व पदविका प्रशिक्षणार्थीना 8 हजार आणि पदवीधर व पदव्युत्तर प्रशिक्षणार्थीना 10 हजार प्रति माह विद्यावेतन 11 महिन्यापर्यंत मिळणार आहे. तरी या योजनेचा बेरोजगार उमेदवारांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाचे सहायक आयुक्त संध्या साळुंखे यांनी केले आहे.

जिल्ह्यातील बेरोजगार उमेदवारांसाठी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत खाजगी क्षेत्रातील आस्थापनांमध्ये विविध प्रकारच्या कार्य प्रशिक्षणाची संधी या विभागाच्या वेबपोर्टलवर ऑनलाईन उपलब्ध करण्यात आली आहे. महाराष्ट्रातील अधिवासी असणारे, उमेदवारांची वयोमर्यादा किमान वय 18 व कमाल 35 तसेच किमान शैक्षणिक पात्रता 12 वी पास, आयटीआय, पदविका, पदवी, पदव्युत्तर (शिक्षण चालू असलेले उमेदवार, NAPS, MAPS उमेदवार या योजनेस सहभागास पात्र असणार नाहीत), आपले आधार नोंदणी असणारे बैंक खाते व आधार संलग्न मोबाईल क्रमांक उमेदवारांनी या विभागाच्या https://www.cmykpy.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी करुन आपली प्रोफाईल अद्यावत करुन या विभागाच्या वेब पोर्टलवर ठाणे जिल्ह्यातील खाजगी आस्थापना. पतसंस्था, बैंका, शैक्षणिक संस्था इ. यांनी कार्य प्रशिक्षणासाठी ऑनलाईन रिक्त पदांची मागणी केली आहे. अशा रिक्तपदांना अप्लाय करुन या योजनेचा लामा घ्यावा. तसेच जिल्ह्यातील 20 पेक्षा जास्त मनुष्यबळ असलेल्या खाजगी आस्थापनांनी आपल्याकडील जास्तीत जास्त प्रशिक्षणार्थीसाठीची रिक्तपदे शासन निर्णयानुसार पोर्टलवर अधिसूचित करावी. याबाबत काही अडचण असल्यास जिल्हा समन्वयक आकाश गोरे संपर्क क्र. 8208212697 किंवा निकीता कारंडे संपर्क क्र.7045571881 यांचे क्रमांकावर संपर्क साधावा, असे ही आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाचे सहायक आयुक्त संध्या साळुंखे यांनी केले आहे.

# महापारेषण विद्युत वाहिनीचा 'मनमानी कारभार'

## शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप आत्मदहनाचा इशारा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण तालुक्यातील कोसले परिसरामध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित कडील उच्च दाबाच्या विद्युत वाहिनीच्या प्रकल्पामुळे शेतकऱ्यांचा संताप उसळला आहे. जमिनीवर अतिक्रमण करताना योग्य मोबदला न देता, कोणतीही पूर्वसूचना न देता तसेच पोलिसांच्या धाकावर काम पुढे नेण्यात येत असल्याचा गंभीर आरोप बाधित शेतकऱ्यांकडून करण्यात आला आहे.

देशाचा आणि राज्याचा विकास शेतकऱ्यांना मान्य आहे; परंतु आमच्याच शेतीवर नांगर फिरवून आम्हाला भूमिहीन करण्याचा अधिकार कुणालाही नाही, असे शेतकऱ्यांचे स्पष्ट म्हणणे आहे. बांधीत झाडे, शेती आणि जमिनीची किंमत न देता काम सुरू केल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये रोष आहे. विद्युत वाहिनीच्या अनेक तारा जमिनीवरून गेल्यानंतर त्या जमिनीची किंमत कोसळते, त्याचा थेट परिणाम शेतीवर अवलंबून असलेल्या कुटुंबांच्या उपजीविकेवर होत असल्याचे शेतकऱ्यांनी निदर्शनास आणले. "शासन म्हणते शेतकरी लाखाचा पोशिंदा आहे; पण प्रत्यक्षात त्याची पिळवणूक सुरू आहे," असा आरोप शेतकरी करत असून न्याय न मिळाल्यास आत्महत्येची वेळ शेतकऱ्यावर येते, असेही त्यांनी सांगितले.

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादितच्या अतिउच्च दाब प्रकल्प विभाग, कल्याणमार्फत ४०० केव्ही बाभळेश्वर–कुडूस वाहिनीचे काम कोसले, काकडपाडा, पळसोली परिसरात सुरू आहे. बाधित शेतकऱ्यांनी योग्य मोबदला मिळाला नाही तर आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. याशिवाय स्थानिक लोकप्रतिनिधींनी या मुद्द्याकडे गांभीर्याने लक्ष देऊन शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्यावा, अन्यथा आगामी निवडणुकीत त्याचे परिणाम भोगावे लागतील, असा थेट इशाराही देण्यात आला आहे.

आमची फसवणूक झाली असून दमदाटीने आमच्या जमिनीवर अधिकारी काम करत आहेत. पुढे मोबदला न देता काम सुरू ठेवले तर आम्ही आमरण उपोषण करू असा इशारा कोसले येथील बाधित शेतकरी सुनील दळवी यांनी दिला आहे.

# भिवंडीतील जिल्हा परिषद शाळेच्या चिमुकल्यांचा मोठा पुढाकार

## खाऊच्या पैशातून सैनिकांसाठी जमवला 11 हजारांचा निधी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : आपल्या सीमेवर अहोरात्र पहारा देणाऱ्या जवानांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी भिवंडीतील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी एक आदर्श पायंडा घालून दिला आहे. भिवंडी तालुक्यातील काल्हेर येथील जिल्हा परिषद शाळेच्या पाचवीतील विद्यार्थ्यांनी आपल्या खाऊचे पैसे वाचवून तब्बल ११,१७० रुपयांचा निधी 'सैनिक कल्याण निधी'साठी जमा केला आहे.

या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे शाळेचे शिक्षक प्रशांत भोसले यांच्या संकल्पनेतून हा देशप्रेमाचा उपक्रम साकार झाला. या विद्यार्थ्यांनी स्वतःच्या खाऊच्या पैशातून ही रक्कम जमा केली. त्यानंतर दि.२० जानेवारी रोजी ठाणे जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांच्याकडे हा निधी सुपूर्द करण्यात आला.

जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी विद्यार्थ्यांच्या या नाविन्यपूर्ण आणि संवेदनशील उपक्रमाचे विशेष कौतुक केले असून, "हा उपक्रम इतर शाळांसाठी प्रेरणादायी ठरेल," असे गौरवोद्गार काढले आहेत. तर "देशासाठी बलिदान देणाऱ्या सैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करणे, हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. शालेय वयातच मुलांमध्ये ही देशभक्तीची भावना रुजावी, हा यामागचा मुख्य उद्देश आहे." अशी भावना ठाणे जिल्हा परिषद प्रशासनाने व्यक्त केली आहे.

# शिरवली जानपाटलाचापाडा येथे माघी गणेश उत्सवा निमित्त हळदी कुंकू व आरोग्य शिबीर

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



**मुरबाड** : माघी गणेश उत्सवाचे औचित्य साधून शिरवली जानपाटलाचा पाडा येथे महिलांसाठी हळदीकुंकू व नागरिकांसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन शिरवलीचे माजी सरपंच तानाजी घागस यांनी केले होते. यासाठी गणपती हॉस्पिटल टिटवाळा व इनफिगो केअर हॉस्पिटल मुरबाड या दोन्ही हॉस्पिटलने ग्रामस्थांच्या आरोग्याची तपासणी केली. तसेच विधवा महिलांना जीवनावश्यक किट वाटप करण्यात आले.यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक सुरेश बांगर सर, डी. वाय. फाउंडेशनच्या ठाणे महिला अध्यक्ष चारुशीला गायकर, कल्पना पवार, सोसायटीचे माजी चेअरमन दत्तात्रय कथोरे, सामाजिक कार्यकर्ते उमेश चौधरी,रविंद्र कराळे, फाउंडेशनचे सोशल मीडिया अध्यक्ष रोहित झुंजारराव सेवा सोसायटीचे सदस्य गजानन दादा पुंडलिक, दामा वाघ, नंदा बांगारा, ग्रामपंचायत सदस्य पूनम शिरोशे, सीआरपी सीमा शिरोशे व ताईबाई सावंत, सीआरपी निशा घागस, अंगणवाडीच्या शिक्षिका छाया चौधरी तसेच बचत गटाच्या अध्यक्षा संगीता घागस उपस्थित होत्या तर पांडुरंग कृपा कॉम्प्युटरचा क्लासच्या संचालिका योगिता घागस यांनी या कार्यक्रमाचे नियोजन केले होते. यावेळी मोठ्या संख्येने ग्रामस्थ व महिलांची आरोग्याची तपासणी करून बीपी, शुगर व रक्त तपासण केली. तसेच विधवा महिलांना जीवनावश्यक किट वाटप केले. तसेच अंगणवाडी शाळेला शैक्षणिक साहित्यही वाटप करण्यात आले. या कार्यक्रमासाठी विशेष मेहनत गावचे माजी सरपंच तानाजी घागस व तुकाराम घागस यांनी केली होती. गावची अननेक विकास कामे झाली आहेत अजूनही काही समस्या असतील तर आम्हाला सांगा आम्ही आमदार किसन कथोरे साहेब यांच्या माध्यमातून भविष्यात त्या पुर्ण करू अशा प्रकारचे आश्वासन सुरेश बांगर यांनी आपल्या भाषणात दिले. तर महिलांसाठी हळदी कुंकवा निमित्त भेटवस्तू देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



# भिवंडीतील गणपती मंदिरांत माघी गणेश जयंतीचा जल्लोष



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी(प्रतिनिधी)** : भिवंडी शहर परिसरातील विविध गणपती मंदिरात गुरुवारी गणेश जयंती उत्सव मोठ्या उत्साहात व भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. महिलांनी फुलांनी सजवलेल्या पाळण्यात बाल गणपतीची मूर्ती ठेवून भजन-कीर्तन करीत गजाननाचा जयघोष केला. यावेळी भाविकांनी गणपती मूर्तीवर पुष्पवृष्टी केली तसेच काही ठिकाणी फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली.

निवडणुकीनंतर झालेल्या दगडफेक व हाणामारीच्या पार्श्वभूमीवर शहरात पोलीस बंदोबस्त तैनात ठेवण्यात आला होता. भिवंडी टॉकीज, कोंबडपाडा, प्रभुआळी, ब्राह्मणआळी, कामतघर आदी भागातील गणपती मंदिरांना फुलांच्या माळा व विद्युत रोषणाईने सजविण्यात आले होते. पहाटेपासून अभिषेक, महाआरती, भजन-कीर्तन व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. भिवंडी तालुक्यातील अंजूर येथील ऐतिहासिक श्री सिद्धिविनायक मंदिरातही गणेश जयंती उत्सव भक्तीभावाने पार पडला. घराघरांत बाल गणपतीची स्थापना करून पालखी व प्रसाद सोहळे आयोजित करण्यात आले होते.

## 'जे एम एफ' शिक्षण संस्थेत
# 'प्रतिकृती काला घोडा' महोत्सव साजरा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली** : कला आणि संस्कृतीचा संगम असलेल्या मुंबईतील 'काला घोडा' महोत्सवाची प्रतिकृती डोंबिवली येथील 'जे एम एफ' शिक्षण संस्थेमध्ये ब्रह्मा रंगतालय प्रांगणात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. राजकुमार कोल्हे व संस्थापिका सचिव डॉ. प्रेरणा कोल्हे यांच्या संकल्पनेतून या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. महोत्सवात विद्यार्थ्यांनी हस्तकला, चित्रकला, कॅनव्हास पेंटिंग, शिल्पकला, रांगोळी व मेहंदी अशा विविध कलांचे सादरीकरण केले. हस्तकलेने तयार केलेला 'काला घोडा'



व विद्यार्थ्यांचे नाविन्यपूर्ण प्रकल्प हे महोत्सवाचे विशेष आकर्षण ठरले. संपूर्ण परिसर कलात्मक साहित्याने सजवण्यात आला होता. ब्रह्मा रंगतालयाच्या मंचावर नृत्य, नाट्यसंगीत, गायन, नृत्यनाट्य तसेच तबला वादनाचे सादरीकरण करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाला उपस्थितांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक करत त्यांना प्रोत्साहन दिले. संस्थापक अध्यक्ष डॉ. राजकुमार कोल्हे यांनी कलाकार हा नेहमीच प्रेक्षकांच्या दादेचा भुकेला असतो, असे सांगत कला ही जीवन समृद्ध करणारी शक्ती असल्याचे मत व्यक्त केले. संस्थापिका डॉ. प्रेरणा कोल्हे यांनी विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेचे कौतुक केले. महोत्सवाच्या यशस्वी आयोजनाबद्दल सहभागी कलाकारांचा सन्मान करण्यात आला. विविध शाळांतील विद्यार्थी, शिक्षक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कल्याण स्थानकावर बनावट रेल्वे विजिलन्स निरीक्षकाला अटक

## 20 हजारांची लाच घेताना रंगेहाथ पकडले

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण रेल्वे स्थानकावर सेंट्रल रेल्वेच्या विजिलन्स पथकाने मोठी कारवाई करत बनावट रेल्वे बोर्ड विजिलन्स निरीक्षकाला लाच घेताना रंगेहाथ अटक केली. हरीश कांबळे असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

एका रेल्वे कर्मचाऱ्याने पैसे मागून धमकावत असल्याची तक्रार विजिलन्स विभागाकडे केली होती. या तक्रारीच्या आधारे सापळा रचण्यात आला. गुरुवारी दुपारी सुमारे १४:३० वाजता कल्याण स्थानकावरील फूट ओव्हर ब्रिज येथे आरोपीला २० हजार रुपये स्वीकारताना पकडण्यात आले. डीआरएम कार्यालयातून थकीत देयक मंजूर करून देण्याच्या नावाखाली ही रक्कम घेतली जात होती.

तपासात यापूर्वी आरोपीने याच कर्मचाऱ्याकडून ६० हजार रुपये फोन-पेच्या माध्यमातून घेतल्याचेही उघड झाले आहे. प्राथमिक चौकशीनंतर आरोपीला पुढील कारवाईसाठी जीआरपी कल्याणच्या ताब्यात देण्यात आले आहे. आरोपीवर २०१२ साली सीएसएमटी येथे बनावट टीसी म्हणून वावरल्याचा गुन्हा दाखल असल्याची माहिती असून, विजिलन्स विभागाकडून सखोल चौकशी सुरू आहे.

# नळेफोडी शाळेत माजी विद्यार्थी संघाची बैठक



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : माजी विद्यार्थी संघ शाळा नळेफोडी यांची महत्त्वपूर्ण बैठक २२ जानेवारी २०२६ रोजी रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, नळेफोडी येथे यशस्वीरीत्या पार पडली. या बैठकीत शाळेच्या शैक्षणिक, सामाजिक व विकासात्मक उपक्रमांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीदरम्यान शाळेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी माजी विद्यार्थ्यांनी एकत्रितपणे योगदान देण्याचा संकल्प केला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी विविध उपक्रम राबविणे, गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणे तसेच शाळेच्या भौतिक सुविधांमध्ये सुधारणा करण्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात आले.या बैठकीसाठी सुदर्शन तांदळेकर, योगेश सहदेव तुपट, पांडुरंग शिंदे, पवन तुपट, चेतन तुपट, रमेश चोरगे, योगेश विश्राम तुपट, सागर बारे, रविंद्र सदाशिव तुपट आदी सदस्य उपस्थित होते.बैठक सौहार्दपूर्ण वातावरणात पार पडली असून आगामी काळात माजी विद्यार्थी संघाच्या माध्यमातून शाळेसाठी विविध उपक्रम राबविण्याचा निर्धार करण्यात आला.

# भिवंडी महापौरपदासाठी मोर्चेबांधणी

## नगरसेवक अज्ञातस्थळी; संख्याबळ नसतानाही भाजपची रणनीती सुरू

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या महापौर पदासाठी सर्वसाधारण आरक्षण जाहीर झाल्यानंतर शहरातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. महापालिकेत कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत मिळालेले नसल्याने सत्ता स्थापनेसाठी सर्वच पक्षांकडून जोरदार हालचाली सुरू झाल्या आहेत. काँग्रेस पक्षाचे सर्वाधिक ३० नगरसेवक निवडून आले असून भाजपचे २२, तर शिवसेनेचे १२ नगरसेवक आहेत. बहुमतासाठी ४७ नगरसेवकांची आवश्यकता आहे.

काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस व समाजवादी पक्षाने एकत्र येत सत्ता स्थापनेसाठी आघाडी उभारण्याचा प्रयत्न सुरू केला असून कोकण भवन येथे जाऊन आपल्या पक्षाचे संख्याबळ अधिकृतपणे नोंदवून नगरसेवक अज्ञातस्थळी रवाना झाले आहेत. समाजवादी पक्षाचे आमदार रईस शेख यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसला सोबत घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

दुसरीकडे भाजप व शिवसेना महायुतीकडून अपक्ष, कोणार्क विकास आघाडी व भिवंडी विकास आघाडीच्या नगरसेवकांना सोबत घेऊन सत्ता स्थापनेसाठी व्यूहरचना आखली जात आहे. यासाठी अनेक नगरसेवकांनी माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांची भेट घेत गोपनीय बैठका सुरू केल्या आहेत. महापौर पदासाठी विविध पक्षांतील संभाव्य उमेदवारांची नावे चर्चेत असून सत्ता स्थापनेसाठी सध्या चुरस निर्माण झाली आहे. स्पष्ट बहुमत नसल्यामुळे भिवंडी महापालिकेत त्रिशंकू अवस्था निर्माण झाली आहे.

**भिवंडी महानगरपालिकेत महापौर आमचाच असेल, असा दावा काँग्रेसकडून केला जात असला तरी काँग्रेसला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी महायुतीकडून काही वेगळी खेळी माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील हे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली करीत असल्याचे चर्चा सुरु झाली आहे. असे असले गेल्या महापौर पदाच्या निवडणुकीत झालेल्या फोडाफोडीचे राजकारणामुळे या निवडणुकीत सुद्धा नगरसेवकांशी अर्थकारण करून फोडाफोडीचे होणार असल्याची दाट शक्यता आहे.**

**पक्षीय बलाबल :-**

**भाजप -२२**
**भारतीय राष्ट्रीय काँग्रेस-३०**
**,शिवसेना (शिंदे )१२,**
**राष्ट्रवादी काँग्रेस(शप )-१२**
**समाजवादी पक्ष-६,**
**कोणार्क विकास आघाडी-४**
**भिवंडी विकास आघाडी-३**
**अपक्ष-१**

# सेवानिवृत्त शिक्षकांचे प्रश्न मार्गी लावणार - रणजित यादव



## वयोवृद्ध सेवानिवृत्त शिक्षकांच्या पालकत्वाची जबाबदारी घ्यावी
### - संघटनेची मागणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबाडी** : भिवंडी तालुक्यातील जिल्हा परिषद सेवानिवृत्त शिक्षकांची पेन्शन पंचायत समितीच्या दुर्लक्षामुळे दरमहा वेळेवर दिली जात नसल्याने वयोवृद्ध शिक्षकांच्या आरोग्य समस्यांकडे दुर्लक्ष होत आहे. या प्रश्नाबाबत सेवानिवृत्त शिक्षकांनी राज्य सेवानिवृत्त संघटनेकडे तक्रार केल्यानंतर संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांची भेट घेऊन लेखी निवेदन दिले.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सेवानिवृत्त शिक्षकांचे सर्व प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्याची ग्वाही दिली असून संबंधित विभागांना स्पष्ट सूचना देण्यात येणार असल्याचे सांगितले. वरिष्ठ वेतनश्रेणीतील तफावत, काल्पनिक वेतनवाढ, आदर्श शिक्षक पुरस्कारप्राप्त शिक्षकांना वेतनवाढ, निवृत्तीच्या तारखेलाच पेन्शन आदेश देणे आदी मागण्या मांडण्यात आल्या.

भिवंडी तालुक्यातील डिसेंबर महिन्याची प्रलंबित पेन्शन जानेवारी १९ रोजी देण्यासाठी कार्यवाही झाल्याने शिक्षकांनी समाधान व्यक्त केले आहे.

# भिवंडी महानगरपालिकेत राष्ट्रीय मतदार दिन साजरा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** :दि.२५ जानेवारी २०२६ रोजी १६ वा राष्ट्रीय मतदार दिवस राज्यस्तर, जिल्हास्तर व मतदान केंद्र स्तरावर साजरा करणेबाबत मा. भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या सूचनेनुसार रविवार दि.२५ जानेवारी २०२६ हा कामकाजाचा दिवस नसल्याने शुक्रवार दि.२३ जानेवारी २०२६ रोजी जिल्ह्यातील सर्व कार्यालयामध्ये मतदान शपथ घेण्याचा कार्यक्रम आयोजित करण्याबाबत सुचित केले होते. त्यानुसार मा. आयुक्त तथा प्रशासक यांनी दिलेल्या निर्देशानुसार शुक्रवार दि.२३ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११. ०० वाजता मा. उप-आयुक्त (मुख्यालय) विक्रम दराडे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्यालयातील तळमजल्यावर मजल्यावर सर्व अधिकारी व कर्मचारी यांचा मतदान शपथ घेण्याचा कार्यक्रम संपन्न झाला.

याप्रसंगी सहाय्यक आयुक्त (निवडणूक) नितीन पाटील, मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ.संदिप गाडेकर, सहाय्यक आयुक्त प्रभाग समिती क्र. ४ गिरीष घोष्टेकर, मार्केट विभाग प्रमुख स्नेहल पुण्यार्थी, आस्थापना विभाग प्रमुख श्रीम. कल्याणी चन्ने, सुरक्षा विभाग प्रमुख राजेश गोसावी, बी.जे.पी. दवाखाना विभाग प्रमुख नितेश चौधरी, बारानिशी विभाग प्रमुख सुरेख पावडे, क्रिडा विभाग प्रमुख निहाला मोमीन व मनपा कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नेताजी सुभाषचंद्र बोस व बाळासाहेब ठाकरे यांना भिवंडी महानगरपालिकेतर्फे अभिवादन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाचे दि. २९/१२/२०२५ च्या परिपत्रकान्वये आणि भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे मा. प्रशासक तथा आयुक्त श्री. अनमोल सागर (भा.प्र.से) यांचे निर्देशानुसार आज दि. २३/०१/२०२५ रोजी नेताजी सुभाषचंद्र बोस व बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती निमित्त महानगरपालिका मुख्यालयातील तळमजल्यावर मजल्यावर मा. उप-आयुक्त (मुख्यालय) श्री. विक्रम दराडे व मा. सहाय्यक आयुक्त (निवडणूक) श्री. नितिन पाटील यांच्या शुभहस्ते पुष्पहार अर्पण करुन त्यांना अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी, मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ.संदिप गाडेकर, सहाय्यक आयुक्त प्रभाग समिती क्र.4 गिरीष घोष्टेकर, मार्केट विभाग प्रमुख स्नेहल पुण्यार्थी, आस्थापना विभाग प्रमुख श्रीम. कल्याणी चन्ने, सुरक्षा विभाग प्रमुख राजेश गोसावी, बी.जे.पी. दवाखाना विभाग प्रमुख नितेश चौधरी, बारानिशी विभाग प्रमुख सुरेख पावडे, क्रिडा विभाग प्रमुख निहाला मोमीन व मनपा कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्हा परिषद ठाणे येथे लोकशाही निष्ठा शपथ

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राष्ट्रीय मतदार दिनाचे औचित्य साधून जिल्हा परिषद ठाणे येथे अधिकारी व कर्मचाऱ्यांना लोकशाही मूल्यांप्रती निष्ठा ठेवण्याची शपथ देण्यात आली. दि. २३ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता जिल्हा परिषद इमारतीच्या आवारात हा कार्यक्रम पार पडला.

या वेळी लोकशाही व्यवस्थेवर विश्वास ठेवणे, संविधानिक मूल्यांचे पालन करणे, मुक्त व निष्पक्ष निवडणूक प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेणे तसेच मतदानाचा हक्क बजावणे याबाबत शपथ देण्यात आली. कार्यक्रमास जिल्हा परिषद ठाणे येथील सर्व अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमातून लोकशाही मूल्यांचे संवर्धन व मतदानाबाबत जागृती करण्याचा उद्देश असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

# ठाण्यात १२ दिवस विविध भागात टप्प्याटप्प्याने पाणी कपात

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे (२३)** - ठाणे महानगरपालिका व बृहन्मुंबई महानगरपालिका यांना पाणी पुरवठा करणाऱ्या पिसे येथे भातसा नदीवर बांधण्यात आलेल्या बंधाऱ्यावर बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेमार्फत भातसा नदीच्या बंधाऱ्यातील पाण्याची पातळी वाढविणेकरिता बसविण्यात आलेले न्युटिक गेट सिस्टीमची दुरुस्तीचे काम हाती घेण्यात येणार आहे. यासाठी दिनांक २७.०१.२०२६ ते दि.०७.०२.२०२६ या कालावधीत न्युटिक गेट सिस्टीमची दुरुस्तीचे काम करणे करीता नदीच्या पाण्याची पातळी कमी करण्यात आली असून या कालावधीत पिसे येथील उदंचन केंद्रात पाण्याची पातळी खालावली आहे. परिणामी, ठाणे महानगरपालिकेस होणारा पाणी पुरवठा २०% कमी झाला असल्याने ठाणे शहरातील पाणी पुरवठा कमी दाबाने होत आहे. या पार्श्वभूमीवर ठाणे महापालिकेने पुढील १२ दिवसांसाठी खालीलप्रमाणे पाण्याचे शटडाऊन घेऊन पाणी वितरणाचे नियोजन करण्यात केले आहे. बुधवार दिनांक २८.०१.२०२६ रोजी गांधीनगर, सुभाषनगर, नळपाडा, वसंत विहार, लोकपुरम, लोकउपवन, एम. एम. आर. डी. ए. तुळसीधाम, वागळे MIDC, चिराग नगर, वर्तकनगर परिसर, समतानगर, वर्तकनगर, भिम नगर परिसर, ज्ञानेश्वर नगर, महात्मा फुले नगर, गंगाधर नगर, वैतीवाडी परिसरातील पाणी पुरवठा सकाळी ९.०० वाजल्यापासून ते दिनांक २९.१.२०२६ रोजी सकाळी ९.०० वाजेपर्यंत २४ तास बंद राहणार आहे. गुरुवार दिनांक २९.०१.२०२६ रोजी दत्तवाडी, बॉम्बे कॉलनी, जीवन बाग, मुंब्रा देवी, शैलेश नगर, उदय नगर, रेतीबंदर, सम्राट नगर, नारायण नगर, मेक कंपनी जलकुंभ ते शंकर मंदिर, संजय नगर परिसर, सिद्धेश्वर, चंदनवाडी, पाटीलवाडी, चरई मावळी मंडळ, कोलबाड, गोकुळनगर, आजाद नगर, खोपट, सिव्हील हॉस्पीटल परिसर, आंबेडकर रोड परिसरातील पाणी पुरवठा सकाळी ९.०० वाजल्यापासून ते दिनांक ३०.१.२०२६ रोजी सकाळी ९.०० वाजेपर्यंत २४ तास बंद राहणार आहे. शुक्रवार ३०.०१.२०२६ रोजी शास्त्रीनगर नं 1 व २, लक्ष्मीपार्क, विहंग पार्क, सुरकरपाडा परिसर, सिद्धाचंल, कळवा, मनिषा नगर, खारेगाव, आतकोनेश्वर नगर, भास्कर नगर, पौंड पाडा, रघुकुल, पारसिक नगर परिसरातील पाणी पुरवठा सकाळी ९.०० वाजल्यापासून ते दिनांक ३१.१.२०२६ रोजी सकाळी ९.०० वाजेपर्यंत २४ तास बंद राहणार आहे. शनिवार दिनांक ३१.०१.२०२६ रोजी लोकमान्य नगर पाडा नं ३ व ४, इंदिरानगर, सावरकररनगर, साठेनगर, आंबेवाडी, डवलेनगर, रामनगर, कैलासनगर, जुनागाव, किसननगर, भटवाडी, श्रीनगर, शांतीनगर, रुपादेवी पाडा परिसरातील पाणी पुरवठा सकाळी ९.०० वाजल्यापासून ते दिनांक १.२.२०२६ रोजी सकाळी ९.०० वाजेपर्यंत २४ तास बंद राहणार आहे. रविवार दिनांक ०१.०२.२०२६ रोजी लोकमान्य नगर पाडा नं १, दोस्ती कॉम्प्लेक्स, वेदांत कॉम्प्लेक्स, कोरस नक्षत्र, रुणवाल कॉम्प्लेक्स परिसर, लोकमान्य नगर पाडा नं २, शास्त्रीनगर नं २, अरुण क्रिडा मंडळ, क्रोम पार्क, मोरेवाडी, गोकुळ नगर, आझाद नगर, मसनवाडा, रुतु पार्क परिसर, मनोरुग्णालय परिसर, शिवाजीनगर, रघुनाथ नगर, डिसोजा वाडी, कशिश पार्क, रहेजा गार्डन, ग्रीष्मा सोसायटी, धर्मवीर नगर, परबवाडी, इंटरनिटी कॉम्प्लेक्स, विष्णु नगर, भास्कर कॉलनी, ब्राम्हन सोसायटी, घंटाळी, राम मारुती रोड, साठेवाडी परिसरातील पाणी पुरवठा सकाळी ९.०० वाजल्यापासून ते दिनांक २.१.२०२६ रोजी सकाळी ९.०० वाजेपर्यंत २४ तास बंद राहणार आहे. सोमवार दिनांक ०२.०२.२०२६ रोजी बाळकुम, राम मारुती नगर, लोढा अमारा, कल्पतरु, ब्रम्हांड, रुतु सिटी, जेलटाकी परिसर, पोलीस लाईन, खारकर अली, जरीमरी, वृंदावन, श्रीरंग, विकास कॉम्पलेक्स, आंबेडकर नगर, क्रांती नगर, साकेत कॉम्पलेक्स, महागिरी, खारटन रोड, सिडको बस स्टॉप परिसर, कोपरी कोळीवाडा, पंचगंगा, राबोडी १ व २. आकाश गंगा परिसरातील पाणी पुरवठा सकाळी ९.०० वाजल्यापासून ते दिनांक ३.१.२०२६ रोजी सकाळी ९.०० वाजेपर्यंत २४ तास बंद राहणार आहे.

मंगळवार दिनांक ०३.०२.२०२६ रोजी माजीवाडा, मानपाडा, कोठारी कंपाऊड, ढोकाळी, मनोरमा नगर, रुनवाल, डोंगरीपाडा, विजयीनगर, विजय पार्क, वाघबीळ, आनंदनगर, कासारवडवली परिसरातील पाणी पुरवठा सकाळी ९.०० वाजल्यापासून ते दिनांक ४.१.२०२६ रोजी सकाळी ९.०० वाजेपर्यंत २४ तास बंद राहणार आहे.

बुधवार दिनांक ४.०२.२०२६ रोजी गांधीनगर, सुभाषनगर, नळपाडा, वसंत विहार, लोकपुरम, लोकउपवन, एम. एम. आर. डी.



ए. तुळसीधाम, वागळे MIDC, चिराग नगर, वर्तकनगर परिसर, समतानगर, वर्तकनगर, भिम नगर परिसर, ज्ञानेश्वर नगर, महात्मा फुले नगर, गंगाधर नगर, वैतीवाडी परिसरातील पाणी पुरवठा सकाळी ९.००वाजल्यापासून ते दिनांक ५.१.२०२६ रोजी सकाळी ९.०० वाजेपर्यंत २४ तास बंद राहणार आहे.

गुरुवार दिनांक ०५.०२.२०२६ रोजी दत्तवाडी, बॉम्बे कॉलनी, जीवन बाग, मुंब्रा देवी, शैलेश नगर, उदय नगर, रेतीबंदर, सम्राट नगर, नारायण नगर, मेक कंपनी जलकुंभ ते शंकर मंदिर, संजय नगर परिसर, सिद्धेश्वर, चंदनवाडी, पाटीलवाडी, चरई मावळी मंडळ, कोलबाड, गोकुळनगर, आजाद नगर, खोपट, सिव्हील हॉस्पीटल परिसर, आंबेडकर रोड परिसरातील पाणी पुरवठा सकाळी ९.०० वाजल्यापासून ते दिनांक ६.१.२०२६ रोजी सकाळी ९.०० वाजेपर्यंत २४ तास बंद राहणार आहे.

शुक्रवार दिनांक ०६.०२.२०२६ रोजी शास्त्रीनगर नं 1 व २, लक्ष्मीपार्क, विहंग पार्क, सुरकरपाडा परिसर, सिद्धाचंल, कळवा, मनिषा नगर, खारेगाव, आतकोनेश्वर नगर, भास्कर नगर, पौंड पाडा, रघुकुल, पारसिक नगर परिसरातील पाणी पुरवठा सकाळी ९.०० वाजल्यापासून ते दिनांक ७.१.२०२६ रोजी सकाळी ९.०० वाजेपर्यंत २४ तास बंद राहणार आहे.

शनिवार दिनांक ०७.०२.२०२६ रोजी लोकमान्य नगर पाडा नं १, दोस्ती कॉम्प्लेक्स, वेदांत कॉम्प्लेक्स, कोरस नक्षत्र, रुणवाल कॉम्प्लेक्स परिसर, लोकमान्य नगर पाडा नं २, शास्त्रीनगर नं २, अरुण क्रिडा मंडळ, क्रोम पार्क, मोरेवाडी, गोकुळ नगर, आझाद नगर, मसनवाडा, रुतु पार्क परिसर, मनोरुग्णालय परिसर, शिवाजीनगर, रघुनाथ नगर, डिसोजा वाडी, कशिश पार्क, रहेजा गार्डन, ग्रीष्मा सोसायटी, धर्मवीर नगर परिसर, परबवाडी इटरनिटी कॉम्प्लेक्स, विष्णुनगर, भास्कर कॉलनी, ब्राह्मण सोसायटी, घंटाळी, राम मारुती रोड, साठेवाडी परिसरातील पाणी पुरवठा सकाळी ९.०० वाजल्यापासून ते दिनांक ८.१.२०२६ रोजी सकाळी ९.०० वाजेपर्यंत २४ तास बंद राहणार आहे.

वरील कामामुळे पाणी पुरवठा पूर्वपदावर येईपर्यंत नागरिकांनी पाण्याचा योग्य तो साठा करून ठेवावा व महापालिकेस सहकार्य करावे असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.




Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024